**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________

   (Name) ____________________

2. (Signature) ____________________

   (Name) ____________________

**OMR Sheet No. :** ..........................................
(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | | |
(In figures as per admission card)

**Roll No.** ____________________
(In words)

**J 0 3 8 1 8**

# PAPER - II
# MARATHI

**Time : 2 hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **16**

Number of Questions in this Booklet : **100**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of hundred multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered on the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (1), (2), (3) and (4). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.

   **Example :** ① ② ● ④ where (3) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark your response at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are however, allowed to carry original question booklet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There are no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में सौ बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका का नंबर OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक का नंबर इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (1), (2), (3) तथा (4) दिये गये हैं। आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।

   **उदाहरण :** ① ② ● ④ जबकि (3) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं। यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें। हालांकि आप परीक्षा समाप्ति पर मूल प्रश्न-पुस्तिका अपने साथ ले जा सकते हैं।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही प्रयोग करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं।**

# MARATHI
# मराठी
## PAPER - II
## प्रश्नपत्रिका - II

**Note :** This paper contains **hundred (100)** objective type questions of two **(2)** marks each. **All** questions are **compulsory**.

**सूचना :** ह्या प्रश्न पत्रिकेत शंभर **(100)** बहु-पर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दोन **(2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.

**1.** भाषेचे स्वरूप उमजून घेत असताना पुढीलपैकी कोणता संकेत ध्यानात ठेवावा लागतो ?

(1) भाषेतील ध्वनिरचना सानुक्रम असली तरी तिच्यामागे कोणताही अर्थसंकेत नसतो.

(2) भाषेतील ध्वनिरचना सुट्या स्वरूपात असून तिच्यामागे कोणताही अर्थसंकेत नसतो.

(3) अर्थहीन ध्वनिरचना रूढीने दिलेली असते.

(4) भाषेतील रचनेचा अनुक्रम आणि अर्थसंकेत यांच्यामागे कोणताही कार्यकारण संबंध नसतो.

**2.** स्वनांचे गुणधर्म अधोरेखित करणारे पुढीलपैकी कोणते विधान स्वीकारता येते ?

(1) भाषेमध्ये स्वन कधीही सुटे सुटे येत नाहीत, व त्यांचे उच्चारण 'व्यक्तिविशिष्ट' असते.

(2) प्रत्येक स्वनाचा उच्चार वैशिष्ट्यपूर्ण नसतो तसेच वागिंद्रियांद्वारे स्वनांची निर्मिती होते.

(3) भाषाव्यवहारासाठीच्या व्याकरणाशी स्वनविज्ञानाचा परोक्ष संबंध असतो, त्यामुळेच शब्द कुठे संपला, याविषयीचे अनुमान लावता येते.

(4) प्रत्येक स्वनाचे उच्चारण अद्वितीय मुळीच नसते व त्यात साम्यापेक्षा भेदच अधिक असतो.

**3.** ''निरीक्षणदृष्ट्या व वर्णनदृष्ट्या पर्याप्त असणारी एकापेक्षा अधिक व्याकरणे उपलब्ध असतील तर ती एकमेकांपेक्षा फक्त 'चिह्न दृष्ट्या भिन्न' असतील,'' असे पुढील विचारवंतांपैकी कोणी म्हटले आहे ?

(1) चार्लस फ्रान्सिस हॉकेट
(2) नोआम चॉम्स्की
(3) जी. सी. लेप्श्ची
(4) फर्डिनण्ड-द-सस्यूर

**4.** इण्डो-युरोपीयन भाषा-कुलाला 'इण्डो-जरमॅनिक' असेही संबोधले जात असून त्यात फिनी, हंगेरियन, लापिश व सॅमोइड या भाषांचा देखील समावेश केला जातो.

(1) संपूर्ण विधान बरोबर
(2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**5.** भाषाविज्ञान विषयक ग्रंथ व तत्संबंधित भाषाभ्यासक यांच्या सार्थक जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मराठीचा भाषिक अभ्यास | (i) | श्री. न. गजेन्द्रगडकर |
| (b) | भाषा व भाषाभ्यास | (ii) | म. अ. मेहेन्दळे |
| (c) | एकभाषिक पुनर्रचना | (iii) | मु. श्री. कानडे |
| (d) | भाषाविचार व मराठी भाषा | (iv) | कृ. पां. कुलकर्णी |
| | | (v) | गं. ब. ग्रामोपाध्ये |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (v) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (v) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

6. आन्तॉइन मेये (Antoine Meillet) ने पुढीलपैकी कोणती अर्थपरिवर्तनाची कारणे सांगितली ?

(1) सांस्कृतिक आदान, संनिहित आदान, शब्दादान

(2) अर्थसंकोच, अर्थविस्तार, अर्थोत्कर्ष

(3) भाषिक व ऐतिहासिक परिस्थिती व सामाजिक स्तरभेद

(4) रूपान्तरादान, भाषान्तरादान, संमिश्रादान

7. 'आर', 'जुगारी', 'वेणा' हे मराठी शब्द अनुक्रमे संस्कृत भाषेतील 'अजगर','द्यूतकार' आणि 'वेदना' ह्या शब्दांशी संबंधित आहेत व अशा दोन स्वरांचा संक्षेप झाल्यास त्या प्रक्रियेस संयुक्तस्वर असे संबोधतात.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

8. 'मशरूल अनाम जुमलेदारांनी व हवालदारांनी व कारकुनांनी दिमत पाय गो मुक्काम मौजे दलवटणे ता॥ चिपळूण मामले दाभोळ सु॥ अबी सबैन व अलफ कसबे चिपळूणीं साहेबी लष्कराची विल्हे केली आणि याउपरी घाटावर कटक जावें ऐसा मान नाही...' ही मराठी भाषा कोणत्या कालखंडातली ?

(1) अव्वल इंग्रजी काळ (2) बहामनी काळ

(3) शिव काळ (4) पेशवे काळ

9. 'परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते'. मुख परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो... आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य.' – हे विधान कोणी व कशासंदर्भात केले आहे ?

(1) ना.गो. कालेलकरांनी 'बोली' च्या संदर्भात

(2) प्रा.अ.का. प्रियोळकरांनी 'कोंकणी' च्या संदर्भात

(3) श्री.म. माटे यांनी भाषाभिव्यक्तीच्या सामाजिक दृष्टीच्या संदर्भात

(4) प्रभाकर मांडे यांनी सांकेतिक भाषा व गुप्त भाषा यांच्या संदर्भात

10. "__________ ही एकीकडून अंशत: प्राचीन व आद्य मराठी, तर दुसरीकडून आधुनिक मराठीपासून व व्याकरण मान्यतेपासून दूर असलेली अशी महाराष्ट्रातील प्रमुख बोली आहे," असे वर्णन मराठीच्या कोणत्या बोलीच्या संदर्भात केले जाते ?

(1) डांगी (2) अहिराणी (3) हळबी (4) वऱ्हाडी

11. पुढीलपैकी कोणती मुख-परंपरा बोली नव्हे ?

(1) खानदेशी (2) हळबी (3) छत्तीसगढी हिन्दी (4) अहिराणी

12. महाराष्ट्रातील चन्द्रपूर तसेच एलिचपूरचा टापू आणि मध्य प्रदेशातील बस्तर, कांकेर, रायपूर ह्या भागात कोणती बोली प्रचलित आहे ?

(1) नागपुरी (2) डांगी (3) हळबी (4) अहिराणी

13. ‘रमणीयार्थप्रतिपादक: शब्द: काव्यं’ ही काव्याची व्याख्या कोणाची ?

(1) भोज (2) रुय्यक (3) राजशेखर (4) जगन्नाथपंडित

14. भारतीय साहित्यशास्त्रात प्रतिभासनिबंधन आणि वस्तुनिबंधन या संज्ञा कोणी वापरल्या ?

(1) अभिनवगुप्त (2) जगन्नाथपंडित (3) राजशेखर (4) भट्टनायक

15. आचार्य कुंतकाने वक्रोक्तीचे किती प्रकार सांगितले आहेत ?

(1) सहा (2) सात (3) आठ (4) नऊ

16. औचित्यविचाराला काव्यचर्चेत अत्यंत महत्त्वाचे स्थान कोणी दिले ?

(1) राजशेखर (2) भोज (3) क्षेमेन्द्र (4) हेमचंद्र

17. साहित्यापासून येणाऱ्या आनंदानुभूतीचे ‘ब्रह्मास्वादसहोदर’ असे वर्णन कोणी केले आहे ?

(1) मम्मट (2) रुद्रट (3) दण्डी (4) विश्वनाथ

18. समीक्षा हे एक शास्त्र आहे, असे मत कोणाचे ?

(1) आर.एस. क्रेन (2) रेने वेलेक (3) नॉर्थ्रॉप फ्राय (4) डब्ल्यू.बी. गॅली

19. समीक्षाशास्त्र ही साहित्यशास्त्राची एक उपजाती आहे, असे कोणी म्हटले ?

(1) म.सु. पाटील (2) गंगाधर पाटील (3) आनंद पाटील (4) पुरुषोत्तम पाटील

20. सिद्धान्त आणि त्याचे प्रवर्तक यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | उदात्ततावाद | (i) | ॲरिस्टॉटल |
| (b) | विरेचनाचा सिद्धान्त | (ii) | क्लिअन्थ ब्रुक्स |
| (c) | अनेकार्थसूचकता | (iii) | विल्यम वर्ड्स्वर्थ |
| (d) | विरोधाभासात्मकता | (iv) | लॉन्जायनस |
| | | (v) | विल्यम एम्पसन् |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (i) | (v) | (ii) |
| (3) | (ii) | (iv) | (iii) | (v) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

21. बेनेडेटो क्रोशे या इटालियन लेखकाने अभिव्यक्तिवादाचा पुरस्कार केला असून, अभिव्यक्तिवाद ही वास्तववादाची प्रतिक्रिया मानली जाते.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

22. ‘सारस्वत समीक्षा’ या समीक्षाग्रंथाचे लेखक कोण ?

(1) के. ना. वाटवे (2) बाळुताई खरे (3) य. र. आगाशे (4) रा.शं. वाळिंबे

**23.** साहित्याचा आविष्काराबरोबरच आशयाच्या अंगानेही विचार करणारी समीक्षापद्धती कोणती ?

(1) समाजशास्त्रीय (2) आदिबंधात्मक (3) शैलीवैज्ञानिक (4) स्त्रीवादी

**24.** संरचनावादाची मुळे रशियन रूपवादाच्या विचारात रूजलेली आढळत असून, विसाव्या शतकातील संरचनावादाचा प्रारंभ हा सोस्यूरच्या 'कोर्स इन जनरल लिंग्विस्टिक्स' या ग्रंथातील आधुनिक भाषाविचाराने झाला.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**25.** गीतगुणाची कविता म्हणजे –

(1) गीत (2) गीतकाव्य (3) भावगीत (4) नाट्यगीत

**26.** चरित्र-आत्मचरित्राचे मूलद्रव्य कोणते ?

(1) सत्य (2) सौंदर्य (3) शिव (4) कथात्मता

**27.** दीर्घकथा मानावी की लघुकादंबरी हे घटनाक्रमाची एकाग्रता आणि व्यामिश्रता यावर अवलंबून असते, मात्र दीर्घकथा ही लघुकादंबरीपेक्षा दीर्घ असू शकते.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**28.** शब्दाचे ज्यावेळी सामान्यरूप आकारत असते, त्यावेळी दंततालव्याचा शुद्धतालव्य व 'स' – काराचा 'श' कार होतो, जसे 'चोच' > 'चोची (ने)', 'ससा > सशा (ला)', राजा > राजा (ने) इत्यादी.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

**29.** मराठी भाषेमध्ये काही धातू असे आहेत की त्यांना काळाचे व अर्थाचे (आख्यातांचे) सर्व प्रत्यय न लागता ते वेगळ्याच प्रकारे चालतात. अशा क्रियापदांना काय म्हणतात ?

(1) अनियमित क्रियापदे (2) प्रयोजक क्रियापदे

(3) संयुक्त क्रियापदे (4) धातुसाधिते (कृदन्ते)

**30.** (a) नळें इन्द्रासी असे बोलिजेलें;

(b) जो-जो कीजे परमार्थ लाहो;

(c) त्वां काय कर्म करिजे लघू लेकराने;

(d) द्विजी निषिधापासाव म्हणीजेलो,

– ही उदाहरणे कोणत्या प्रकारच्या प्रयोगाची होत ?

(1) प्रधान कर्तृक कर्मणी प्रयोग (2) शक्य कर्मणी प्रयोग

(3) पुराण कर्मणी प्रयोग (4) समापन कर्मणी प्रयोग

31. ‘येळकोट’, ‘हडपा’, ‘भांगार’, ‘गुंडी’, ‘टपाल’ हे शब्द मराठीत कोणत्या भाषेद्वारे आले ?
(1) तेलुगू (2) तुळू (3) कन्नड (4) तमीळ

32. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमानुसार लिहिला आहे ?
(1) मूर्धन्यीकरण (2) मुर्धन्यीकरण (3) मूर्धन्यिकरण (4) मुर्धन्यिकरण

33. इटालियन राजनीतिज्ञ मॅकियावेलींच्या ‘दी प्रिन्स’ ह्या ग्रंथाच्या मराठी भाषांतराचे शीर्षक कोणते ?
(1) राजपुत्र (2) राजकुंवर (3) राजा (4) राजन्

34. अनंत सिंग लिखित ‘चित्तगाँग हीरोज फाइट फॉर फ्रीडम’ ह्या पुस्तकाचा वि.स. वाळिम्बे यांनी केलेल्या मराठी भाषांतराचे शीर्षक कोणते ?
(1) माझे देश–माझा लोक (2) कथा ही दिवावादळाची
(3) समर्पण (4) माझा मृत्युलेख

35. पत्रलेखनाचे तीन घटक कोणते ?
(1) संदर्भ, मजकूर, पत्ता (2) विषय, संदर्भ, मजकूर
(3) मायना, मजकूर, पत्ता (4) दिनांक, संदर्भ, पत्ता

36. जाहिरातींमुळे निकृष्ट उत्पादनाला भरघोस मोल प्राप्त होते, त्यामुळे सर्वच जाहिराती या फसव्या असतात.
(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

37. बातमी ही एखाद्या घटनेचे वृत्तपत्रात तात्काळ येणारे विवेचन असते, तर वृत्तांतलेखन हे त्या घटनेचे, सविस्तरपणे माहिती गोळा करून साधारणत: सप्ताहानंतर, नोंदविलेले विवेचन असते.
(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

38. ‘‘लीळाचरित्र म्हणजे महानुभाव धर्मपंथाच्या तत्त्वज्ञानाची आणि आचारसूत्रांची जन्मभूमी होय.’’ असा लीळाचरित्राचा गौरव कोणी केला ?
(1) व. दि. कुलकर्णी (2) श्री. रं. कुलकर्णी (3) व. दा. कुलकर्णी (4) भीमराव कुलकर्णी

39. सूत्रपाठावर भाष्य करणाऱ्या महानुभावीय पक्षकारांची संख्या किती ?
(1) 24 (2) 21 (3) 25 (4) 13

40. ‘‘टाळी वाजवावी, गुढी उभारावी। वाट ही चालावी पंढरीची॥ पताकांचे भार मिळाले अपार। भरले भीमातीर जयजयकारे॥’’ हा अभंग कोणाचा ?
(1) चोखामेळा (2) सोयराबाई (3) जनाबाई (4) तुकाराम

**41.** मराठी संतमंडळात 'कबिराचा अवतार' आणि मोरोपंतानी आपल्या 'सन्मणिमाले' त ज्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे, असा संत कोण ?

(1) शेख महंमद (2) चांद बोधले (3) मुंतोजी (4) हुसेन अंबर

**42.** 'मल्हारी विजया' चा कर्ता कोण ?

(1) कृष्णदयार्णव (2) श्रीधर
(3) महीपतीबुवा ताहराबादकर (4) निरंजनमाधव

**43.** 'तुझी संगती नाही कामाची। मी सुंदरा कोवळ्या मनाची'– ही गौळण कोणी लिहिली ?

(1) नामदेव (2) तुकाराम (3) ज्ञानदेव (4) एकनाथ

**44.** पंडितकवी व त्यांचे ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा :

(a) वामनपंडित (i) रामदासवर्णन
(b) विठ्ठल बीडकर (ii) यथार्थदीपिका
(c) रघुनाथपंडित (iii) रुक्मिणीहरण
(d) सामराज (iv) बिल्हणचरित्र
(v) मुद्गलाख्यान

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (v) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (v) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

**45.** 'मुसलमानांच्या सहवासाने, त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला'. हे विधान कोणाचे ?

(1) र. वि. हेरवाडकर (2) वि. का. राजवाडे (3) गं. ब. ग्रामोपाध्ये (4) श्री. रं. कुलकर्णी

**46.** 'सत्कर्माचा तोटा। समय खोटा रे खोटा' हा फटका कोणी लिहिला ?

(1) सगनभाऊ (2) प्रभाकर (3) अनंत फंदी (4) रामजोशी

**47.** ''संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब असले तरी शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे– ''
– हे विधान कोणाचे आहे ?

(1) गंगाधर मोरजे (2) म.वा. धोंड (3) म.ना. अदवंत (4) य.ना. केळकर

**48.** ग्रंथकार व ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा.

(a) म. ना. अदवंत (i) तंतकवी तथा शाहीर
(b) म. ना. सहस्रबुद्धे (ii) मऱ्हाटी शाहीर
(c) म. वा. धोंड (iii) मऱ्हाटी लावणी
(d) श्री. म. वर्दे (iv) पैंजण
(v) मऱ्हाटी शाहिरी वाङ्मय

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (iv) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (v) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (v) | (ii) | (iii) |
| (4) | (i) | (iv) | (v) | (iii) |

49. ' बखर हे ऐतिहासिक शोधनाचे दुय्यम साधन असले, तरीही बखर हे वाङ्मयाचे प्रथम दर्जाचे लेखन होय'–

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

50. 'सितारा मंझिल' या कादंबरीचे लेखक कोण ?

(1) वि. स. खांडेकर (2) वि. वा. शिरवाडकर

(3) विश्राम बेडेकर (4) विजया राजाध्यक्ष

51. आर.डी. पाटील ही व्यक्तिरेखा, महाराष्ट्रातील मंत्री म्हणून कोणत्या कादंबरीत येते ?

(1) बेइमान (2) धग (3) प्रतिनिधी (4) माणूस

52. 'शूरा मी वंदिले' हे कोणत्या नाटकातील पद आहे ?

(1) स्वयंवर (2) सौभद्र (3) मानापमान (4) पुण्यप्रभाव

53. 'एक शून्य बाजीराव' या नाटकाचे लेखक कोण ?

(1) विजय तेंडुलकर (2) चिं. त्र्यं. खानोलकर

(3) जयवंत दळवी (4) सतीश आळेकर

54. 'रिल्के आणि नूरजहान' यांना ललित लेखनात एकत्र आणणारा लेखक कोण ?

(1) अनंत काणेकर (2) ना. सी. फडके

(3) ग्रेस (4) श्रीनिवास विनायक कुलकर्णी

55. कोणत्या टीकाकाराने विनोदी लेखनही केले आहे ?

(1) श्री. के. क्षीरसागर (2) मं. वि. राजाध्यक्ष (3) रा. श्री. जोग (4) सु. रा. चुनेकर

56. 'दुसरा आइन्स्टाइन' ही विज्ञानकथा कोणी लिहिली ?

(1) जयंत नारळीकर (2) बाळ फोंडके

(3) लक्ष्मण लोंढे (4) सुबोध जावडेकर

57. कथा आणि कथाकार यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | गुलाम | (i) | वामन चोरघडे |
| (b) | कमान | (ii) | पु. भा. भावे |
| (c) | सतरावे वर्ष | (iii) | जी. ए. कुलकर्णी |
| (d) | कातरवेळ | (iv) | विजया राजाध्यक्ष |
| | | (v) | अरविंद गोखले |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (v) | (iv) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (ii) | (v) |
| (4) | (v) | (iv) | (iii) | (ii) |

**58.** वाळवंटात आता फक्त सुरवंटच उरले, हे कोणत्या कवीच्या कवितेतील, मत आहे ?

(1) पु. शि. रेगे (2) सदानंद रेगे (3) ग्रेस (4) आरती प्रभू

**59.** 'तमाच्या तळाशी दिवे लागले,' हा काव्यचरण कोणत्या कवीचा आहे ?

(1) श्रीधर शनवारे (2) शंकर रामाणी (3) वि. म. कुलकर्णी (4) गु. ह. देशपांडे

**60.** सर्व अंत:सृष्टी व बाह्यसृष्टी यावरील मानवाची उमटलेली संस्कारमुद्रा म्हणजे संस्कृती होय – ही संस्कृतीची व्याख्या कोणाची ?

(1) दु. का. संत (2) सदा कऱ्हाडे (3) द. के. केळकर (4) गं. बा. सरदार

**61.** 'रुक्मिणीस्वयंवर' काव्यात शृंगारप्रचुर वाटणाऱ्या वर्णनांना एकनाथ चटकन अध्यात्माचा रंग देतात, तसे त्यांच्या काव्यातून महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रतिबिंबही उमटले आहे.

(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक

(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**62.** गांधीजींनी पुरस्कारलेल्या सत्याग्रहाच्या जनमानसावरील प्रभावाचे वर्णन करणारी कादंबरी कोणती ?

(1) प्रतिज्ञा (2) माझे रामायण (3) अमृतवेल (4) इंदू काळे सरला भोळे

**63.** लोकहितवादींच्या 'शतपत्रा' तील पत्रांची संख्या किती ?

(1) 100 (2) 101 (3) 121 (4) 108

**64.** 'राजा राममोहन रॉय म्हणजे भारतीय जागृतीचे अग्रदूत'–असे कोणी म्हटले आहे ?

(1) दादोबा पांडुरंग तर्खडकर (2) आचार्य जावडेकर

(3) गोपाळ गणेश आगरकर (4) महात्मा जोतिबा फुले

**65.** सामाजिक, सांस्कृतिक संस्था व त्यांचे संस्थापक यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्रार्थना समाज | (i) | दयानंद सरस्वती |
| (b) | आर्य समाज | (ii) | गोपाळ गणेश आगरकर |
| (c) | सत्यशोधक समाज | (iii) | न्यायमूर्ती रानडे |
| (d) | शारदासदन | (iv) | महात्मा फुले |
| | | (v) | पंडिता रमाबाई |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (v) | (iv) | (iii) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (v) |
| (3) | (v) | (ii) | (i) | (iv) |
| (4) | (ii) | (iii) | (v) | (i) |

**66.** 'गाय एक उपयुक्त पशू ... माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे' असा विचार मांडणाऱ्या निबंधाचा लेखक कोण ?

(1) लोकहितवादी (2) वि. रा. शिंदे (3) वि. दा. सावरकर (4) गो. ग. आगरकर

67. ‘मला मातृभूमीच नाही’ असे भावोद्‌गार कोणाचे ?
(1) वि. दा. सावरकर (2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(3) म. फुले (4) लोकहितवादी

68. म. फुले यांनी ‘गुलामगिरी’ या ग्रंथाची किती भागात मांडणी केली आहे ?
(1) 8 (2) 12 (3) 14 (4) 16

69. साहित्य हे त्याच त्या आवर्तात सापडले असता त्यांतून बाहेर फुटणे हे वाङ्‌मयीन चळवळीचे कारण असून त्या चळवळी नेहमीच यशस्वी झाल्या आहेत.
(1) संपूर्ण विधान बरोबर (2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (4) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

70. पुढीलपैकी कोणत्या लेखकाचा मराठी भाषाशुद्धिविषयक विचारांशी संबंध नाही, असे मानले जाते ?
(1) विष्णुशास्त्री चिपळूणकर (2) स्वातंत्र्यवीर सावरकर
(3) डॉ. माधवराव पटवर्धन (4) आचार्य विनोबा भावे

71. पुढीलपैकी कोणते नियतकालिक हे साहित्यसंस्थेचे मुखपत्र आहे ?
(1) अनुष्टुभ् (2) पंचधारा (3) अभिरुची (4) प्रतिभा

72. ‘पायांचे अलंकरण’ कोणत्या साहित्यकृतीत येते ?
(1) एकच प्याला (2) औदुंबर (3) पृथ्वीचे प्रेमगीत (4) श्यामची आई

73. ‘भिंतीवरचे नकाशे फडफडल्याने देशात भूकंप होत नसतात !’ अशा आशयाचा उद्‌गार कोणत्या लेखकाचा आहे ?
(1) वि. वा. शिरवाडकर (2) साने गुरूजी (3) रंगनाथ पठारे (4) रा. ग. गडकरी

74. ‘समुद्राचे डबके झाले होते’ ही कल्पना कोणत्या कादंबरीत आहे ?
(1) बळी (2) रणांगण (3) वज्राघात (4) ताम्रपट

75. ‘‘दिले हिरण्मय
हाती मृण्मय
हा हत विनिमय ’’
ही काव्य चरणे कोणाची ?
(1) केशवकुमार (2) केशवसुत (3) बालकवी (4) कुसुमाग्रज

76. Folklore चे भाषांतर म्हणून ‘लोकविद्या’ हा शब्दप्रयोग पुढीलपैकी कोणत्या अभ्यासकाने केला ?
(1) दुर्गा भागवत (2) म. म. दत्तो वामन पोतदार
(3) शं. गो. दाते (4) वि. का. राजवाडे

77. पंजाबमधील लोककथागीतांचा संग्रह 'Legends of the Punjab' कोणी प्रसिद्ध केला ?
(1) लालबिहारी डे (2) जॉर्ज ग्रिअर्सन (3) हान (4) रिचर्ड टेंपल

78. 'लोककथांच्या प्रसाराचा अभ्यास करून कथाविशेषांचे मूळ रूप शोधून त्यांच्या केंद्रस्थानासंबंधी निर्णय देता येतो' असे मत कोणत्या संप्रदायाने मांडले ?
(1) मानवशास्त्रीय संप्रदाय (2) मानसशास्त्रीय संप्रदाय
(3) अवशेषवादी संप्रदाय (4) ऐतिहासिक भौगोलिक संप्रदाय

79. ''पांड्या रे पांड्या
दुकान मांड्या
दुकानाची किल्ली हारोपली
पांड्यानं बायको झोडपली''
वरील लोकगीत कोणत्या प्रकारातील आहे ?
(1) लग्नाची गाणी (2) भूलाबाईची गाणी (3) बडबडगीते (4) देवाची गाणी

80. पुढील लोकगीतातून नेमका कोणता अर्थ जाणवतो ?
घागर घिसन पाण्याला गयीना
मनी चोंबल राही गयीना
मनी सासू मोठी खराबना
मना घरमा घुसू देईना
.....................................
मना सासरा मोठा खराबना
मनी मागे कटका लावसना
.....................................
मना नवरा मोठा चांगला ना
मना घरमा घुसू देईना
(1) सासरच्या कटकटींविषयीची गाऱ्हाणी (2) नवऱ्याविषयीचे प्रेम
(3) सासू-सासरा यांच्यावरील टीका (4) सासूरवाशिणीचा विसरभोळा स्वभाव

81. ''एकापेक्षा एक अधिक भाषांतील साहित्यकृतींची (साहित्यशास्त्र व समीक्षा यांवरील ग्रंथांसह) वैधर्म्य, साधर्म्य, मूलस्रोत किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय.''
– हे विधान कोणाचे ?
(1) हेन्री एच्. एच्. रेमाक (2) एस्. एस्. प्रावर
(3) एम्. एफ्. ज्यूयर्द (4) पॉल वॅन टिघेम

82. पुढीलपैकी कोणती साहित्यकृती विश्व साहित्यकृतींच्या कोटीत समाविष्ट होऊ शकत नाही ?
(1) द ओल्ड मॅन अ‍ॅण्ड द सी (2) वॉर अ‍ॅण्ड पीस
(3) महाभारत (4) सत्तावनचा सेनानी

83. ''बांगला भाषेतील 'मेघनादवध' हे रामायणाधिष्ठित महाकाव्य भारतीय काव्य म्हणता येणार नाही, कारण त्या रचनेचे नाते संस्कृत महाकाव्याशी नसून इंग्रजी महाकाव्याशी होते.''
– हे मत कोणाच्या संदर्भात व्यक्त केले आहे ?

(1) रवीन्द्रनाथ ठाकूर
(2) जीवनानन्द दास
(3) काझी नझरूल इस्लाम
(4) मायकल मधुसूदन दत्त

84. भाषान्तर विद्येच्या संदर्भातील प्रकारांची व्यवस्था पुढीलपैकी कोणत्या प्रकारे केली जाते ?

(1) आन्तरभाषीय, आन्तरचिन्हीय, भाषान्तर्गत
(2) आन्तरचिन्हीय, आन्तरराष्ट्रीय, व्यतिरेकान्तर्गत
(3) भाषान्तर्गत, आन्तरराष्ट्रीय, व्यतिरेकान्तर्गत
(4) माध्यमान्तर्गत, आन्तरराष्ट्रीय, व्यतिरेकान्तर्गत

85. भाषान्तरित नाटके व मूळ नाटक यांच्या सार्थक जोड्या जुळवा.

(a) गोची — (i) रिसरेक्शन
(b) चन्द्र जेथे उगवत नाही — (ii) गॉन आउट
(c) पण्डित विद्याधर — (iii) फाउस्ट
(d) पान्थस्थ — (iv) द सेक्रेड फ्लेम
(v) आ! वाइल्डनेस

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (v) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (v) |

86. 'ए रूम ऑफ वन्स ओवन्' आणि 'थ्री गिनीज', हे साहित्यिक स्त्रियांच्या संदर्भातील दोन वैचारिक निबंध कोणी लिहिले ?

(1) एलन शोवॉल्टर
(2) सिमॉन द बोव्हा
(3) सॅण्ड्रा गिल्बर्ट व सूझन ग्यूबर
(4) व्हर्जिनिया वुल्फ

87. स्त्रीवादी विचारमंथन करणारे लेखन व तत्संबंधित लेखिका यांच्या सार्थक जोड्या लावा.

(a) थॉटस् ऑन एज्युकेशन ऑफ डॉटर्स — (i) जुलिया क्रिस्तेवा
(b) फेमिनिन मिस्टिक — (ii) जर्मेन ग्रीर
(c) सेक्युलर पॉलिटिक्स — (iii) बेट्टी फ्रीडन
(d) दी फिमेल इउनक — (iv) केट मिलेट
(v) वुलस्टोन क्राफ्ट

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (v) | (iii) | (iv) | (ii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

88. ''स्त्रिया उदंड कविता लिहितात, पण त्या कविता स्त्रीवादी असतातच असे नाही. काही एक विशिष्ट भूमिका स्वीकारून कविता लिहिणाऱ्या फार थोड्या कवयित्री आहेत. स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या, अन्यायाला व अत्याचाराला वाचा फोडणाऱ्या एक-दोन कविता लिहिल्या म्हणून कुणी स्त्रीवादी होत नाही. स्त्रीवाद ही एक चळवळ आहे. तो वृत्तीत आणि कृतीत मुरावा लागतो... *तळ्यात आणि मळ्यात* असे एकाचवेळी दोन्हीकडे राहता येणार नाही, ही भूमिका पक्की झाली की साहित्यनिर्मिती आपोआप त्या दृष्टिकोनातून होते.''

मराठी स्त्री-प्रश्नसंबद्ध लेखनाविषयीचे हे मत कोणाचे ?

(1) कविता महाजन (2) अश्विनी धोंगडे

(3) वंदना भागवत (4) रजनी जोगळेकर

89. ''आता सोंगे पुरे झाली
सारी ओझी जड झाली
उतरून ठेवून आता तरी
माझी मला शोधू दे
तुकडे तुकडे जमवू दे
विशाल काही पुजू दे....''

ही काव्यचरणे कोणाची ?

(1) अश्विनी धोंगडे (2) इन्दिरा सन्त (3) शान्ता शेळके (4) संजीवनी मराठे

90. महाराष्ट्रातील स्त्री-मुक्ती संघटनेची स्थापना कधी झाली ?

(1) ऑक्टोबर, 1975 (2) नोव्हेंबर, 1975 (3) सप्टेंबर, 1975 (4) ऑगस्ट, 1975

91. कथा आणि कथाकारांच्या जोड्या जुळवा.

(a) बिनचवीचा घास (i) ग. दि. माडगूळकर

(b) काशीयात्रा (ii) वामन चोरघडे

(c) वेडी रखमा (iii) म. भा. भोसले

(d) भाकरी (iv) रा. रं. बोराडे

(v) द. र. कवठेकर

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (v) |
| (2) | (v) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (v) | (ii) |
| (4) | (iv) | (v) | (i) | (ii) |

92. अंधश्रध्देने व भोंदूगिरीने भरडलेला समाज व ढोंगी ज्योतिष्याचे कपट कारस्थान पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीतून आढळते ?

(1) तृतीय रत्न (2) बळीबा पाटील (3) पिराजी पाटील (4) होळीची पोळी

93. ''मला या शहरात
जास्तवेळ राहवत नाही रे
माझ्या आठवणीने व्याकूळ होतात
गावाकडल्या रानात झरे....''
कवितेच्या वरील ओळी कोणाच्या ?

(1) ना. धों. महानोर
(2) इंद्रजित भालेराव
(3) वाहरू सोनवणे
(4) निळकंठ महाजन

94. ग्रामीण भागातील क्रूर आणि हिडीस राजकारणाचे चित्रण पुढीलपैकी कोणत्या कादंबरीत आढळते ?

(1) गांधारीचे डोळे
(2) मेलेलं पाणी
(3) उलट चालिला प्रवाह
(4) पाचकू

95. खेड्यातील कृषिव्यवस्था ही ग्रामीण जीवन व्यवहाराच्या केंद्रवर्ती असली तरी; अलीकडे यंत्रसंस्कृतीच्या ग्रामीण जीवनावरील आक्रमणामुळे ग्रामीण साहित्य नागर साहित्य बनू लागले आहे.

(1) संपूर्ण विधान बरोबर
(2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

96. ग्रंथकार आणि ग्रंथ यांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | रामनाथ चव्हाण | (i) | बुध्दकालीन स्त्रीजीवन |
| (b) | गंगाधर पानतावणे | (ii) | रामायणातील संस्कृति-संघर्ष |
| (c) | वसंत मून | (iii) | जाती आणि जमाती |
| (d) | अरुण कांबळे | (iv) | प्रबोधनाच्या दिशा |
| | | (v) | प्रबुध्द भारत : नवी वाट |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (v) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (ii) | (v) | (iii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (i) | (v) | (iv) |

97. आर्थिक शोषणाचे निराकरण मार्क्सवादात आहे त्यामुळे मार्क्सवाद दलित साहित्याची प्रेरणा ठरतो.

(1) संपूर्ण विधान बरोबर
(2) संपूर्ण विधान चूक
(3) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(4) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

98. ''हजारो वर्षे मी होतो खंगत
या गुहागुहांतल्या प्रचंड अंधारात
कालच 'तो' गुहेच्या तोंडाशी
ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे, यापुढचा काळ !''
नामदेव ढसाळांच्या वरील कवितेतील 'तो' हे संबोधन कोणासाठी वापरलेले आहे ?
(1) कार्ल मार्क्स (2) म. फुले
(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (4) राजर्षी शाहू महाराज

99. आदिवासींच्या जगण्याचे आणि त्यांच्या विकासासंबंधीचे विचार पुढीलपैकी कोणत्या कादंबरीत आढळतात ?
(1) तांबडा दगड (2) उपराधी (3) बलिदान (4) पोखरण

100. ''मागून मिळत नाही
मिळवावे लागते बाहुबळावर
दे ना सोडून
खाली मान घालून
जगण्याची सवय
कुठवर करणार कालहरण ?''
वरील ओळी लिहिणारा कवी कोण ?
(1) दया पवार (2) त्र्यंबक सपकाळे (3) वामन निंबाळकर (4) यशवंत मनोहर

- o 0 o -

**Space For Rough Work**